अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २०.११.२०२६

जिल्हा : कोल्हापूर

मागील आठवड्यातील हवामान (१४.११.२०२६ ते २०.११.२०२६)							हवामान घटक		पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२१.११.२०२६ ते २५.११.२०२६)				
१४	१५	१६	१७	१८	१९	२०	दिनांक		२१	२२	२३	२४	२५
०.०	०.०	०.०	०.०	०.०	०.०	०.०	पाऊस (मिमी)		०	०	०	०	०
३१.६	३१.६	३१.५	३१.०	३१.४	३०.८	२९.६	कमाल तापमान (अं.से.)		२९	३०	३०	३१	३२
१५.५	१६.२	१६.५	१५.४	१५.८	१६.४	१३.८	किमान तापमान (अं.से.)		१४	१६	१८	१९	१९
०	०	०	०	०	०	०	स.	ढग स्थिती (आकाश)	१	२	३	३	६
३	१	०	०	०	०	०	दु.						
६९	७७	७८	८१	६७	६४	६५	सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)		५४	६१	५७	५२	६३
३१	३३	३३	३२	३७	३४	२५	दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)		४२	४२	४२	५०	६१
२.७	१.७	१.४	२.३	१.६	३.४	२.३	वाऱ्याचा वेग (किमी/तास)		८	६	४	६	८
पू.	ई.	प.	प.	पू.	ई.	ई.	स.	वाऱ्याची दिशा	पू. ई.	पू. ई.	ईशा.	पू. ई.	पू.
उ.ई	प.	ई.	आ.	वा.	ई.	वा.	दु.						

मागील आठवड्यातील पाऊस (मिमी)	पाऊस ०१.०१.२०२६ पासून आजपर्यंत (मिमी)	पाऊस दिवस ०१.०१.२०२६ पासून आजपर्यंत
०.०	९५०.३	६७

हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

पीक	अवस्था	कृषि विषयक सल्ला
हवामान सारांश		प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार कोल्हापूर जिल्ह्यामध्ये २१ व २२ नोव्हेंबर रोजी आकाश मुख्यत: स्वच्छ तर २३ व २४ नोव्हेंबर रोजी आकाश अंशत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. **कोल्हापूर जिल्ह्यामध्ये २५ नोव्हेंबर पर्यंत कमाल तापमान २९.० ते ३२.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची तसेच २१ व २२ नोव्हेंबर रोजी किमान तापमान १४.० ते १६.० अंश सेल्सिअस दरम्यान तसेच २३, २४ व २५ नोव्हेंबर रोजी किमान तापमानामध्ये २ ते ३ अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता असून किमान तापमान १८ ते १९ दम्यान राहण्याची शक्यता आहे.** सकाळची सापेक्ष आद्रता ५२ ते ६३%, दुपारची सापेक्ष आद्रता ४२ ते ६१% तसेच वाऱ्याचा वेग ताशी ०४ ते ०८ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे.
विस्तारित श्रेणी अंदाज		विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक २५ नोव्हेंबर ते १ डिसेंबर दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची, कमाल तापमान सरासरी दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे.
सामान्य सल्ला		थंडीचे प्रमाण वाढल्यामुळे नागरीकांनी पुढीलप्रमाणे काळजी घ्यावी ➢ वृद्ध लोक आणि लहान मुलांची काळजी घ्यावी ➢ थंडीच्या दरम्यान जास्तीती जास्त वेळ घरात राहावे. प्रवास शक्यतो टाळावा ➢ स्वेटर, मफलर, कानटोपी, पायमोजे हात मोजे घालावेत ➢ गरम पेय नियमितपने प्यावे ➢ हवामानाच्या अद्यावत महितीसाठी रेडियो ऐकावा, टिव्ही पाहावा तसेच वर्तमान पत्र वाचावे
संदेश		➢ फळे तसेच भाजीपाला पिकांमध्ये शक्य असल्यास आच्छादंनांचा वापर करावा आच्छादनासाठी ऊसाच्या पाचटाचा वापर करावा
भात	पक्वता	➢ पक्व झालेल्या मध्यम व उशिरा पक्व होणाऱ्या भात वाणांची कापणी करावी. कापणी केलेले पीक ३ ते ४ दिवस वाळवून मळणी करावी आणि मळणीनंतर धान्य सुरक्षित व कोरड्या ठिकाणी साठवावे.
नाचणी	पक्वता	➢ पक्व झालेल्या पिकांची काढणी करावी. सूर्यप्रकाश उपलब्ध होताच काढणी केलेली पिके चांगली वाळवावीत. वाळवणीनंतर मळणी करून शेतमाल सुरक्षित व कोरड्या ठिकाणी साठवावा.
मका	पक्वता / पेरणी	➢ पक्व झालेल्या पिकाची काढणी करावी व काढणी व मळणी करून तयार शेतीमाल सुरक्षित ठेवावा ➢ रब्बी हंगामासाठी पाण्याची उपलब्धता असल्यासच मका पेरणी लवकरात लवकर पूर्ण करावी ➢ मका पिकाच्या पेरणीसाठी लवकर पक्व होणाऱ्या सुधारित वाणांची निवड करावी. मका पिकाची पेरणी ७५ × २० सें.मी. अंतरावर करावी. ➢ पेरणीच्या वेळी ३५ किलो युरिया, १५० किलो सिंगल सुपर फॉस्फेट व २८ किलो म्युरेट ऑफ पोटॅश प्रति एकरी या प्रमाणात द्यावे. ➢ पेरणीपूर्वी बियाण्यास क्लोरॅन्ट्रानिलिप्रोल ५०% एफ.एस. औषधाची ५ मि.ली. प्रति किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी. ➢ मका पेरणीनंतर लगेच किंवा दुसऱ्या दिवशी शिफारशीत अॅट्राझीन हे तणनाशक ५०० ग्रॅम प्रति २०० लिटर पाणी प्रति एकर या प्रमाणात मिसळून जमिनीवर फवारणी करावी.

अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

		➢ चाऱ्यासाठी मका लागवड करण्यासाठी आफ्रिकन टॉल, गंगा सफेद, मांजरी कॉम्पोझीट या वाणांची निवड करावी. ➢ मका पिकाची उगवण झाल्यानंतर एका आठवड्याच्या आत लष्करी अळीच्या सर्व्हेक्षणासाठी एकरी ५ कामगंध सापळे लावावेत. ➢ लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी नर पतंग आकर्षित करण्यासाठी एकरी १५ कामगंध संपले लावावेत. पक्षी थांबे उभा करावेत ➢ पिकाच्या उगवणीनंतर पहिल्या ४ आठवड्यांच्या आत ५% झाडांवर लष्करी अळीचा प्रादुर्भाव आढळल्यास अझाडिरॅक्टिन १५०० पीपीएम किंवा निंबोळी अर्क ५० मिली प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.
गहू	पेरणी	➢ सिंचनासाठी पुरेशा पाण्याची खात्री असल्यासच लवकरात लवकर गहू पिकाची पेरणी पूर्ण करावी ➢ बागायती गव्हाची पेरणी वेळेवर करण्यासाठी फुले समाधान, फुले अनुपम, फुले सात्विक, एम,ए,सी.एस ६२२२, एन.आय.ए.डब्ल्यु ११४९ या वाणांची निवड करावी ➢ पेरणीपूर्वी बियाण्यास थायरम ७५% डब्ल्यू. एस. या बुरशी नाशकाची ३ ग्रॅम प्रती किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी तसेच गहू पिकावरील मावा, तुडतुडे आणि खोडमाशी या किडींच्या नियंत्रणासाठी थायोमेथोक्झाम ७० डब्ल्यु. पी. १७.५ मिली प्रती १० किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी. बुरशीनाशकाची व कीटकनाशकाची बीजप्रक्रिया करून बियाणे वाळवल्यानंतर प्रती किलो बियाण्यास २५ ग्रॅम अॅझोटोबॅक्टर व २५ ग्रॅम पीएसबी या जीवाणू संवर्धन खताची बीजप्रक्रिया करावी त्यामुळे उत्पादनात १० ते १५ % वाढ होते.
ऊस	शाकिय वाढ	➢ सिंचनासाठी पुरेशा पाण्याची खात्री असल्यासच पूर्वहंगामी ऊस लागवड ३० नोव्हेंबर पर्यंत करावी ➢ पूर्व हंगामी उस लागवड करण्यासाठी को. ८६०३२, को.एम. ०२६५ (फुले २६५), फुले १०००१, फुले ११०८२, फुले ऊस १५०१२, फुले ऊस १३००७, फुले ऊस १५००६ या वाणांची निवड करावी ➢ बीजप्रक्रिया : बुरशीजन्य रोगांचा बंदोबस्त करण्यासाठी बेणे लागणीपूर्वी १० लिटर पाण्यात १० ग्रॅम कार्बेन्डॅझिमची १० मिनीटांसाठी बेणे प्रक्रिया करावी. त्यानंतर हेक्टरी १० किलो अॅसेटोबॅक्टर + १.२५ किलो पी.एस.बी. १०० लिटर पाण्यात ३० मिनिटे जीवाणू बीजप्रक्रिया करावी. यामुळे नत्रखतामध्ये ५०% ची तर स्फुरदखतामध्ये २५% ची बचत करता येते. ➢ पाण्याची उपलब्धता लक्ष्यात घेऊन आडसाली उस लागवडिस १२ ते १६ आठवडे झाले असल्यास नत्राचा तिसरा हप्ता देण्यासाठी ३५ किलो युरिया म्हणजे ०.७८ पोती युरिया प्रती एकरी या प्रमाणात द्यावा ➢ ऊस पिकास पाणी देण्यासाठी ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करावा आणि ठिबक सिंचनाद्वारे पाण्यात विरघळणारी खते द्यावीत. ➢ जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी उसाची खालची वाळलेली पाने काढून त्यांचा आच्छादनासाठी वापर करावा. ➢ ऊस पिकास एक सरी आड पाणी द्यावे. ➢ उसाचे पाचट जाळू नये. शक्यतो त्याचा आच्छादनासाठी वापर करावा. पाचट लवकर कुजण्यासाठी कुजविणाऱ्या सूक्ष्मजीव संवर्धकाचा वापर करावा. त्यामुळे जमिनीत सेंद्रिय पदार्थांची भर पडेल. ➢ खोडवा व्यवस्थापन: ऊस तोडणीनंतर पाचट सरीमध्ये दाबून घ्यावे. बुडके जमिनीलगत छाटून घ्यावेत.त्यानंतर लगेच ०.१ टक्के कार्बेन्डॅझिम या बुरशीनाशकाची फवारणी करावी. छाटणीसाठी वापरण्यात येणारा कोयता निर्जंतुक करून घ्यावा
हरभरा	पेरणी/ वाढीची अवस्था	➢ खात्रीशीर पाण्याची उपलब्धता असल्यासच बागायती हरभरा पेरणी लवकरात लवकर पूर्ण करावी ➢ पेरणीकरता विजय, विशाल, दिग्विजय,फुले विक्रम, फुले विक्रांत आणि फुले विश्वराज या मर रोगास प्रतिकारक्षम असलेल्या वाणांची निवड करावी ➢ जोमदार वाढीसाठी पिक सुरूवातीपासूनच तण विरहीत ठेवावे तसेच पिक २० दिवसांचे झाल्यानंतर पहिली कोळपणी करावी. ➢ हरभरा पिकावरील घाटेअळीच्या नियंत्रणासाठी पक्षी थांबे उभारावेत व हेक्टरी ५ या प्रमाणे कामगंध सापळे लावावेत. ➢ हरभरा पिकास पाणी देण्यासाठी तुषार सिंचन पद्धतीचा वापर करावा
आंबा	नवीन पालवी	➢ मागील आठवड्यामध्ये काही ठिकाणी अंशत: ढगाळ हवामान राहिल्यामुळे आंब्यावरील तुडतुड्यांच्या जैविक नियंत्रणासाठी मेटारायझियम अॅनीसोप्ली १.१५ टक्के पाण्यात मिसळणारी भुकटी (१x १०९ बिजाणु प्रती ग्रॅम) ५० ग्रॅम प्रती १० लीटर पाण्यात मिसळून पहिली फवारणी फुलोरा येण्यापूर्वी तसेच गरजेनुसार फुलोऱ्यात असताना २ ते ४ फवारण्या आठवडयाच्या अंतराने कराव्यात
मिरची	फळ धारणा	➢ मागील आठवड्यामध्ये काही ठिकाणी कोरडे हवामान राहिल्याने मिरची पिकावर फूलकिडे किडीचे प्रमाण दिसून येत आहे. फुलकिडे हे पानाच्या खालच्या व वरच्या बाजूस राहतात आणि पानातील रस शोषून घेतात त्यामुळे पानाच्या कडा वरील बाजूस वळतात. पाने लहान होतात यालाच बोकड्या किंवा चुरडा-मुरडा असे म्हणतात. ➢ नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रिड १७.८ % एस.एल. २.५ मिली किंवा फिप्रोनिल ५ एस.सी. २० मिली. किंवा स्पिनोटोरम या किटकनाशकाच्या आलटून पालटून फवारण्या कराव्यात. ➢ शेतामध्ये निळे चिकट सापळे एकरी २० ते २५ या प्रमाणात वापरावे.
टोमॅटो	फळ धारणा	➢ कमाल तापमान २५ ते ३२ अंश सेल्सियस दरम्यान राहण्याची असल्याने टोमॅटो पिकावर फळे पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी पिकावर नोवाल्युरोन १०% ई.सी. किंवा क्लोरॅनट्रनीलीप्रोल १८.५ एस.सी. ३ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
पशुधन	वाढीची	➢ एलनिनोच्या पार्श्वभूमीवर रब्बी हंगामात चारा पिकांचे नियोजन १. खरीप हंगामात उपलब्ध असलेला चारा योग्य प्रकारे वाळवून साठवून ठेवावा. २. जनावरांच्या खाद्यात झाडांच्या पाल्याचा वापर करावा. उदा. सुबाभूळ, शेवरी, तुती, शेवगा, वड, उंबर आणि पिंपळ. ३. केळीची काढणी झाल्यानंतर तिची पाने आणि खोड जनावरांच्या चाऱ्यासाठी वापरता येतात.

अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

		४. ज्या ठिकाणी उसाची वाढे चाऱ्यासाठी वापरली जातात, तेथे प्रत्येक जनावराला ५० ग्रॅम खनिज मिश्रण द्यावे. ५. उपलब्ध पाण्याचा वापर करून चाऱ्यासाठी ज्वारीची लागवड करावी. ६. आंतरपीक म्हणून चारा पिकांची निवड करावी. ७. पाणी उपलब्ध असल्यास कमी कालावधीत चारा देणाऱ्या चवळी, बरसीम आणि लसूणघास (ल्युसर्न) यांसारख्या पिकांची लागवड करावी.
कुक्कुटपालन	वाढीची	➢ थंडीच्या काळात कुक्कुटपालकांनी पक्ष्यांना उबदार, कोरड्या व हवेशीर शेडमध्ये ठेवावे. पक्ष्यांचे थंड वाऱ्यापासून संरक्षण करावे. पुरेसे खाद्य व स्वच्छ पिण्याचे पाणी द्यावे. विशेषतः लहान पिलांसाठी योग्य तापमान राखावे व रोगांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी शेडमधील आच्छादन कोरडे ठेवावे.

मेघदूत अॅप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे	दामिनी अॅप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे

ठिकाण : कोल्हापूर
दि. : २०.११.२०२६

स्वाक्षरीत
प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा
सहयोगी संशोधन संचालक,
विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर